श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

सप्टेंबर २०२५ | वर्ष – १३ अंक – ९ | मासिक, पाने १६ | Regn.No. - MAHMAR/2022/86035

## श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज् ट्रस्ट येथे भारताचा ७९वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



*स्वातंत्र्यदिन सोहळ्यातील मान्यवर – (डावीकडून) डॉ. रिटा मुल्हेरकर, डॉ. सुनील नाडकर्णी, श्री. विकास वालावलकर, प्रमुख पाहुणे श्री. चंद्रशेखर भडसावळे, सौ. अनुराधा भडसावळे, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. मानसिंगराव घाटगे, डॉ. चंद्रशेखर एल.*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज् ट्रस्ट, डेरवण येथे भारताचा ७९वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कृषिरत्न श्री. चंद्रशेखर भडसावळे यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थित मान्यवर, डॉक्टर्स, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना अर्पित करून राष्ट्रगीत, महाराष्ट्रगीत व ध्वजगीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे विद्यार्थी आर्या चोचे, ऋषदा मुकादम आणि चिन्मयी मोहिरे यांनी केले. संस्थेच्या प्रशालेतील शिक्षिका श्रीमती सोनल सकपाळ यांनी प्रमुख पाहुणे कृषिरत्न श्री. भडसावळे यांचा परिचय करून दिला.

पूर्व-प्राथमिक गटापासून एम.बी.बी.एस.पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याबरोबरच देशाच्या विविध क्षेत्रांतील प्रगतीविषयी माहितीपूर्ण व प्रेरणादायी भाषणे सादर केली. इयत्ता नर्सरी, ज्युनिअर के.जी. आणि सिनियर के.जी.च्या लहानग्यांनी आपल्या भाषणातून राष्ट्रध्वजातील रंगांचे महत्त्व उलगडून सांगितले तसेच थोर स्वातंत्र्यसेनानींची आठवण करून दिली.

आपल्याला मिळालेलं हे स्वातंत्र्य लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, भगतसिंग आणि अशा अनेक थोर नेत्यांच्या शौर्य व बलिदानामुळे शक्य झालं आहे. त्यांनी आपल्याला दिलेल्या या अमूल्य स्वातंत्र्याबद्दल आपण सदैव कृतज्ञ राहून भारताला जगातील सर्वोत्तम देश बनवण्यासाठी पूर्ण प्रयत्न करू, असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

इयत्ता दुसरीच्या कु. शिवम पाटील या विद्यार्थ्याने आपला भारत देश समृद्ध संस्कृतीसाठी जगप्रसिद्ध असून आपली संस्कृती आपल्याला वडीलधाऱ्यांचा सन्मान, निसर्गावर प्रेम आणि शांततेत एकत्र राहण्याचे धडे देते तसेच भारतीय सांस्कृतिक वारशातील आयुर्वेद व खगोलशास्त्रीय अभ्यास, प्राचीन शिल्पकला, शास्त्रीय नृत्यप्रकार यांचा आपल्याला अभिमान असल्याचे सांगितले. इयत्ता चौथीच्या कु. इलाक्षी जोशी आणि कु. आयेशा चिकटे या



मान्यवरांकडून तिरंग्याला मानवंदना – राष्ट्राभिमानाचा क्षण



विद्यार्थी, शिक्षक व पालकांना उद्देशून प्रमुख पाहुणे श्री. चंद्रशेखर भडसावळे यांचे मार्गदर्शक उद्बोधन

विद्यार्थिनींनी आपल्या शेतकऱ्यांना, आपल्या व्यवसायांना पाठिंबा देऊन आत्मनिर्भर भारताचे महत्त्व सांगत परदेशी खाद्यपदार्थांना हद्दपार करून स्वदेशी अन्नाला व व्यवसायांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले. इयत्ता सहावीतील कु. आर्य खेडेकर याने आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारतीय क्रीडापटूंनी परिश्रम, शिस्त आणि जिद्दीच्या बळावर मिळवलेले यश केवळ त्यांच्यासाठीच नव्हे तर संपूर्ण भारतासाठी अभिमानाची बाब ठरते, त्यांच्या कार्यातून देशाची ओळख अधिक गौरवशाली होते व युवकांना प्रेरणा मिळते असे आपल्या भाषणातून प्रतिपादन केले.

इयत्ता सातवीच्या कु. रेणू सुर्वे आणि कु. आराध्या चव्हाण या दोघींनी भारताची कार्यकुशलता, उद्यमशीलता या विषयावर हिंदी भाषेत भाषण केले. इयत्ता आठवीच्या कु. अनय सप्रे याने ऑपरेशन 'सिंदूर'मागे भारताची भूमिका आणि नागरिक म्हणून माझ्या जबाबदाऱ्या या विषयावर इंग्रजी भाषेत भाषण केले. इयत्ता नववीच्या कु. नव्या शिंदे हिने संस्कृत भाषेतून, भारताने केलेल्या कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची माहिती दिली. तसेच कु. प्रांजल सुर्वे व कु. स्वरांगी देवस्थळी या दोघींनी भारताचे अंतराळ क्षेत्रातील भरीव योगदान व भविष्यातील नवे संशोधनाचे पाऊल याची माहिती आपल्या मराठी भाषणातून सांगितली. इयत्ता दहावीच्या कु. समर्थ हेंबाडे आणि सहावीच्या कु. रुद्र अय्यर यांनी जर्मन भाषेतून तसेच इयत्ता दहावीच्या कु. राधा पाटणकर व इयत्ता पाचवीच्या कु. सोज्वल्या जाधव यांनी स्पॅनिश भाषेतून अपरिचित महिला स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याविषयी माहिती दिली.

एम.बी.बी.एस. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु. असरीन चौधरी हिने आपल्या भाषणातून विचार मांडले की, भारत हा फक्त नकाशावरील देश नसून तो एक सजीव आत्मा आहे – रंग, बलिदान आणि आशेच्या धाग्यांनी विणलेली एक अद्भुत गुंफण आहे. विविध भौगोलिक परिस्थितींनी, भाषांनी, परंपरांनी नटलेला हा देश तिरंगा फडकला की एक कुटुंब म्हणून एकत्र उभा राहतो – हीच आपली खरी ताकद. सैनिकांचे शौर्य, शेतकऱ्यांचे परिश्रम, शास्त्रज्ञांची बुद्धिमत्ता, शिक्षक, डॉक्टर आणि नागरिकांची जिद्द, भारताच्या प्रगतीची ज्योत प्रज्वलित ठेवतात. स्वातंत्र्य ही केवळ साजरी करण्याची गोष्ट नाही, ती एक जबाबदारी आहे. आजचे



स्वातंत्र्यदिन सोहळ्याला विद्यार्थी, कर्मचारी व पालकांची उत्स्फूर्त उपस्थिती



विद्यार्थी शिस्तबद्ध कवायत सादर करताना



देशभक्तीच्या स्वरांना नृत्याची जोड देताना विद्यार्थी

युवक हे उद्याच्या भारताचे पथदर्शक आहेत. आपण ज्या भारताचे स्वप्न पाहतो, त्यासाठी निडरपणे कार्य करू या आणि या देशावरचे प्रेम फक्त शब्दांतच नव्हे तर कृतीतून दाखवू या.

७९व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने बोलताना प्रमुख पाहुणे कृषिरत्न श्री. चंद्रशेखर भडसावळे यांनी शाश्वत शेती, ग्रामीण सक्षमीकरण आणि आत्मनिर्भरता हे विकसित भारताचे आधारस्तंभ असल्याचे अधोरेखित केले. याविषयी बोलताना ते पुढे म्हणाले की, भारताला अन्नधान्य उत्पादनाच्या बाबतीत अग्रेसर राहून 'विश्व विजय' संपादन करणे सहज शक्य आहे. कारण, भारताकडे



मल्लखांब - शरीराचे संतुलन, मनाची एकाग्रता, पारंपरिक खेळ यांचा संगम - स्वातंत्र्यदिनानिमित्त भारताच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन

भौगोलिक विविधता, अनुकूल हवामान आणि योग्य पर्जन्यमान यांचे नैसर्गिक वरदान आहे; त्यामुळे आपण जगात अन्न उत्पादनात आघाडी घेऊ शकतो.

कुपोषण आणि मातीचा ऱ्हास ही देशापुढील प्रमुख आव्हाने आहेत, असंही ते म्हणाले. निरोगी, सुपीक जमीन ही पौष्टिक अन्नधान्य उत्पादनासाठी आणि पर्यायाने शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अतिशय महत्त्वाची आहे. महाराष्ट्रात त्यांनी स्वतः विकसित केलेल्या आणि संयुक्त राष्ट्रांनी मान्यता दिलेल्या सगुणा राईस टेक्निक (SRT) तंत्राची ओळख करून देताना ते म्हणाले की, या तंत्राद्वारे शेतकऱ्यांना कमी खर्चात, कमीत कमी संसाधनांचा वापर करून, तसेच हानिकारक रासायनिक खतांचा वापर टाळून, मातीची पोषणमूल्य वाढविणे शक्य आहे. तसेच, ही एक हवामानाशी जुळवून घेणारी आणि शाश्वत कृषी प्रणाली आहे.

जागतिक अन्न टंचाई आणि हवामान बदल या परस्पर निगडित समस्या आहेत असा इशारा देत त्यांनी, १९६०च्या दशकाप्रमाणे भारताने परदेशी अन्न पुरवठ्यावर अवलंबून राहणे टाळले पाहिजे. एवढेच नव्हे तर त्याऐवजी जागतिक अन्न पुरवठादार बनले पाहिजे, असेही म्हटले. आपल्या भाषणाची सांगता करताना, तरुणांनी मातीचे संरक्षण करावे, तसेच शाश्वत पद्धतींचा अवलंब करून भावी पिढ्यांसाठी अन्न सुरक्षा वाढविण्याचे काम करावे, असे आवाहन केले.

प्रशालेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीतांवर आधारित नृत्य व डम्बेल्स कवायत प्रकार सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली. तसेच योग व मल्लखांब प्रात्यक्षिकांचे नेत्रदीपक सादरीकरण केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका जान्हवी चाळके यांनी केले. कार्यक्रमाला संस्थेचे प्रमुख विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर, संस्थेचे पदाधिकारी, डॉक्टर्स, विविध विद्याशाखांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक आणि नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# भ.क.ल. वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयात शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक




*उजवीकडून – डॉ. नेताजी पाटील, सौ. शरयू यशवंतराव, डॉ. गौरी पुरोहित, डॉ. ज्योती अय्यर, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. ऋता मुल्हेरकर, डॉ. अरविंद नातू, श्री. विकास वालावलकर, श्री. अशोकराव जोशी, डॉ. अनिल काकोडकर, डॉ. अरविंद यादव , डॉ. चंद्रशेखर गर्दे, डॉ. मानसिंगराव घाटगे , श्री. बाळासाहेब काजरेकर, डॉ. सुनील नाडकर्णी; मागे डॉ. हसबनीस, डॉ. शहापूरकर*

भ.क.ल. वालावलकर महाविद्यालय, डेरवण येथे दि. १२ सप्टेंबर २०२५ रोजी शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक पार पडली. ही समिती ग्रामीण भागातील समाजाचे प्रश्न समजावून घेणे आणि त्याकरिता वैद्यकीय प्राध्यापक आणि विद्यार्थी यांनी केलेले संशोधन यावर चर्चा व मार्गदर्शन करते.

अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण अनिल काकोडकर, टाटा मेमोरियलचे सेंटरचे ॲकॅडेमिक डायरेक्टर डॉ. श्रीपाद बाणावली, शास्त्रज्ञ डॉ. ऋता मुल्हेरकर, डॉ. अरविंद नातू (AIISR पुणे) डॉ. चंद्रशेखर गर्दे आदी सदस्य उपस्थित होते. पद्मभूषण डॉ. टी. रामासामी आणि डॉ. अविनाश सुपे (सेवानिवृत्त डीन के. इ. एम. रुग्णालय, मुंबई) यांनी बैठकीला ऑनलाइन उपस्थिती दर्शविली. डॉ. सुवर्णा पाटील यांनी डेरवण कोहर्टचे अपडेट्स (किशोरी मुलींच्या आरोग्यासंदर्भात दीर्घ काळ सुरु असणाऱ्या संशोधनाचे परिणाम आणि फायदे) यावर भाष्य केले. कोकणात प्रामुख्याने दिसून येणाऱ्या एका नव्या प्रकारच्या मधुमेहाचे म्हणजे टाईप फाईव्ह डायबेटिसचे पहिल्यांदाच निदान केले गेले आणि त्यावर सुरू असलेले संशोधन आणि उपाय योजना याची माहिती त्यांनी दिली आणि संस्थेच्या उपक्रमांचा आढावा सादर केला.

समितीसमोर पदव्युत्तर विद्यार्थीनींनी कुपोषण आणि त्यातून उद्भवणारा मधुमेह, हृदयरोग, मूत्रपिंडातील खडे, वाढत्या जंक फूड सेवनामुळे होणारे दुष्परिणाम, कोकणातील समाजाच्या कुपोषणाची करणे इत्यादींवर विस्तृत चर्चा आणि आपले संशोधन यावर सादरीकरण केले. अँजिओग्राफिकली सिद्ध, हार्ट ॲटॅक आलेल्या रुग्णांमध्ये चरबीचे प्रमाण कुपोषित असूनही जास्त आहे यावर डॉ. गौरी पाटील यांनी सादरीकरण केले. डेंग्यूचा वाढता प्रभाव आणि त्यातून उद्भवणाऱ्या गुंतागुंती वेळीच लक्षात येण्याकरिता रक्ताच्या काही नवीन टेस्ट्सचा वापर या विषयावर डॉ. दर्शनी चिंचोलकर (मेडिसिन रेसिडेंट) ह्यांनी प्रकाश टाकला.

ग्रामीण भारतातील बाळाच्या वाढीसाठी स्तनदा माता आणि आईच्या दुधाचे प्रमाण आणि त्यातील जीवनावश्यक घटक मोजण्याचा नवीन प्रकल्प या विषयांवर डॉ. रोहित भट यांनी सादरीकरण केले आणि 'आय. ए. ई.' या संस्थेकडे प्रकल्पासाठी आर्थिक मदत मागितली असल्याचे सांगितले.

कोकण किनारी नवजात शिशूंमध्ये थायरॉईड संप्रेरकाची कमतरता याकरिता 'महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ऑफ हेल्थ सायन्से'सद्वारे 'MUHS चक्र' उपक्रमाद्वारे निधी प्राप्त करून बालकांच्या बुद्धीची वाढ कशी करता येईल याबाबत डॉ. अनुप निलावर, प्राध्यापक, बायोकेमिस्ट्री विभाग यांनी विस्तृत माहिती दिली.

ग्रामीण भागात नव्याने आढळणारे संसर्गजन्य जंतू तसेच एस.टी.एस. आणि आय.सी.एम.आर. यांनी निधी दिलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांबद्दल डॉ. योगेंद्र शेळके, (प्राध्यापक-मायक्रोबायोलॉजी विभाग) यांनी समितीला माहिती दिली.

मुतखड्याचे वाढते प्रमाण आणि त्याचे रासायनिक पृथक्करण या विषयावर श्री. पार्थ प्रभुदेसाई, पीएच.डी. रिसर्च असोसिएट यांनी सादरीकरण करून मुतखडे आणि त्याचे कोकणात असणारे प्रकार याचा मागोवा घेतला. लहान मुलांची शारीरिक

वाढ आणि आहार याचा आलेख काढण्याकरिता एसव्हीजेसीटी शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा गट करून त्याद्वारे 'शरीररचना आणि पोषण' या प्रकल्पाची माहिती श्रीमती मनाली चितळे, एपिडेमियोलॉजिस्ट आणि न्यूट्रिशनिस्ट, ब्लूमिंग्टन, यूएसए यांनी दिली.

'सेंद्रिय कृषी उद्यमशीलता आणि त्याकरिता विकासाचे डेरवण मॉडेल' या विषयावर प्रा. श्रीहरी एन. हसबनीस यांनी डेरवण येथील शेती उत्पादनात वाढ होण्याकरिता होणारे नवनवीन प्रयोग यावर प्रकाश टाकला.

रुरल हेल्थ केअर ट्रान्सफॉर्मेशन (राहत) – (CCDC, नवी दिल्ली, ICMRद्वारे निधीपुरवठा)बाबत डॉ. रचना पावसकर (साहाय्यक प्राध्यापक) यांनी ग्रामीण केंद्रामध्ये रुग्णांसाठी विविध डिजिटल ॲप्लिकेशन्सचा वापर कसा केला जाईल यावर भाष्य केले.

कर्करोग आणि मधुमेहासाठी बायोमार्कर म्हणून 'आर. एन.ए.'वरील संशोधन या विषयावर वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. नीलम शिरसाट यांनी आपले सादरीकरण केले

REACH (ग्रामीण सक्षमीकरण आणि सामुदायिक आरोग्य) अंतर्गत तरुण मुलींचे सक्षमीकरण आणि कौशल्य उपक्रम यावर डॉ. ज्योती अय्यर यांनी माहिती दिली.

मणक्यातील एखादी चकती घसरल्यामुळे दाब निर्माण होऊन वेदनादायी होते तेव्हा त्या चकतीतील पेशी काढून त्यावर प्रक्रिया करून कालांतराने त्या पेशी दुर्बिणीद्वारे पुन्हा त्या चकतीच्या टिकाणी घालून रुग्णाला वेदनामुक्त करण्याविषयी सुरू असलेल्या संशोधनाच्या फेज १ क्लिनिकल ट्रायलमध्ये आलेले अनुभव अंकिता बेंद्रे, सहशास्त्रज्ञ यांनी कथित केले आणि फेज १ क्लिनिकल ट्रायलमध्ये नोंदणीकृत ३ रुग्णांवरील क्लिनिकल आणि रेडिऑलॉजिकल अहवाल मानसी पांचाळ यांनी सादर केला

डॉ. सुनील नाडकर्णी, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ ऋता मुल्हेरकर आणि शर्वाणी डोळे यांनी संशोधनातून रुग्णांमध्ये झालेली सुधारणा आणि त्याचे शास्त्रीय कारण याचा आढावा घेतला. प्रोपोलिस आणि फणसाच्या बियांच्या पावडरचे व्यावसायिकरण करण्यासाठी नियामक मान्यता मिळण्याकरिता डॉ. गौरी पुरोहित, यांनी सादरीकरण केले. एसव्हीजेसीटी शाळेतील विद्यार्थ्यांनी नेक्स्टजेन ब्रिज, प्रगत ग्रंथालय, थर्मोस्पीड कंट्रोलर या प्रकल्पांचे सादरीकरण अतिशय उत्साहात केले. डॉ. अनिल काकोडकर यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला हे वाखाणण्यासारखे आहे.

अशा विविध विषयांवर सुरु असलेल्या सर्वांगीण उपक्रमाचे कौतुक करत शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी समाधान व्यक्त केले. आरोग्य शिक्षण आणि ग्रामीण समाजाचे स्वावलंबन ह्यात संस्थेने केलेल्या विकासाचा आलेख असाच उंचावत राहो अशी अशा व्यक्त करत बैठकीचा समारोप केला.

## मधुमेहतज्ज्ञ डॉ. वरुण दामले यांची वालावलकर रुग्णालय व ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाला भेट



*मध्यभागी डावीकडून (अकरावे) डॉ. आनंद जोशी, डॉ. अनिल दामले, डॉ. वरुण दामले, डॉ. सुवर्णा पाटील, सोबत पदव्युत्तर विद्यार्थी डॉक्टर्स*

मधुमेहतज्ज्ञ डॉ. वरुण दामले यांची दि. २० सप्टेंबर २०२५ रोजी भ.क.ल. वालावलकर रुग्णालय व ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाला भेट दिली. सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. अनिल दामले यांचे सुपुत्र डॉ. वरुण दामले यांनी एम. बी. बी. एस, एम. डी. (मेडिसिन झाल्यावर प्रसिद्ध मधुमेहतज्ज्ञ डॉ. व्ही. मोहन यांच्या डायबेटिस एज्युकेशन ॲकॅडमी, चेन्नई, तामिळनाडूमधून मधुमेहशास्त्रात पोस्ट डॉक्टरेट फेलोशिप मिळवली आहे.

डॉ. वरुण दामले यांनी पदव्युत्तर विद्यार्थ्यांना '780G' इन्सुलिन पंप या विषयावर व्याख्यान दिले आणि वालावलकर रुग्णालयात मधुमेहावरील नवीन संशोधन, होणारे उपचार याची पाहणी करून समाधान व्यक्त केले आणि पुढे जाऊन संस्थेला मधुमेहकेंद्र स्थापन करण्याकरिता पूर्ण सहकार्य करू अशी ग्वाही दिली.

# इंडियन असोसिएशन ऑफ बायोमेडिकल सायंटिस्ट कार्यशाळा संपन्न



परिषदेला उपस्थित विद्यार्थी, शिक्षक, संशोधक शास्त्रज्ञ

इंडियन असोसिएशन ऑफ बायोमेडिकल सायंटिस्ट या संशोधकांच्या राष्ट्रीय संघटनेच्या पश्चिम विभागाची परिषद दि. ७.०९.२०२५ रोजी भ.क.ल. वालावलकर रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालय येथे संपन्न झाली. या परिषदेत पश्चिम भारतातील महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, कर्नाटक अशा विविध राज्यातून १४३ विद्यार्थी, शिक्षक संशोधक शास्त्रज्ञांनी सहभाग नोंदविला. परिषदेत सकाळच्या सत्रात उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर डॉ. सुवर्णा पाटील (वैद्यकीय संचालक) डॉ. नेताजी पाटील (भ.क.ल. वालावलकर रुग्णालय), डॉ. अनिल मडके (श्वास लाईफ लाईन सेंटर, सांगली), डॉ. नागोबा (MIMSR वैद्यकीय महाविद्यालय, लातूर), डॉ. विनोद भागवत (उपाध्यक्ष, IABMS) तसेच डॉ. अरविंद यादव (आयोजक सचिव) हे उपस्थित होते. त्यानंतर विविध विषयांवरील तज्ज्ञांची निमंत्रित व्याख्याने झाली. डॉ. अश्विनी पाटील (सावर्डे), डॉ. अनिल मडके (सांगली), डॉ. बी. एस. नागोबा (लातूर), डॉ. सी. एस. गौतम (चंदिगड), प्रा. डॉ. मंजुळा शांताराम (मेंगलोर), डॉ. अनुप निलावार (सावर्डे) यांनी व्याख्याने दिली.

दुपारच्या सत्रात विविध ठिकाणाहून आलेल्या संशोधकांचे विविध विषयावरील नऊ प्रतिनिधींनी शोधनिबंध सादर केले तर चार प्रतिनिधींनी पोस्टर स्वरूपात सादर केले. या सादरीकरणाचे परीक्षण करण्यात आले आणि त्यातून सर्वोत्तम शोधनिबंध सादर करणाऱ्याची निवड करण्यात आली. डॉ. बी. एस. नागोबा (लातूर) आणि डॉ. शेळके यांनी परीक्षकांचे काम पाहिले. परिषदेची सांगता पुरस्कार व प्रतिनिधींना प्रमाणपत्र वाटपाने झाली. आभार डॉ. चेतन जवसेन यांनी व्यक्त केले.

# माननीय आमदार श्री. सदाभाऊ खोतसाहेब यांची एसव्हीजेसीटी डेरवणला भेट




*मा. आमदार सदाभाऊ खोत यांच्या भेटीच्या वेळी उपस्थित - (डावीकडून) श्री. प्रफुल्ल गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, डॉ. नेताजी पाटील, श्रीपती वालावलकर, श्री. खोत, श्री. विकासराव वालावलकर, डॉ. सुवर्णा पाटील आणि अन्य*

माननीय आमदार श्री. सदाभाऊ खोतसाहेब यांनी दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट डेरवण, चिपळूण येथे भेट दिली. त्यांचा अभिप्राय त्यांच्याच शब्दात-

*''आज आम्हाला कोकणातील समाजकार्याची प्रेरणा देणाऱ्या श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्टच्या (डेरवण ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) कार्याची प्रत्यक्ष पाहणी (१३.०९.२०२५) करण्याची संधी मिळाली. आरोग्य, शिक्षण आणि समाजसेवा या तिन्ही क्षेत्रात ट्रस्टने उभारलेले कार्य खरंच कौतुकास्पद आहे. विशेषतः*



*श्री. विकासराव वालावलकर मा. आमदार श्री. सदाभाऊ खोत यांचे स्वागत करताना*

*बी.के.एल. वालावलकर हॉस्पिटल, शिक्षण संस्था आणि विविध सामाजिक उपक्रम पाहून मन आनंदित झाले. समाजातील गरजूंसाठी एवढं मोठं कार्य करणाऱ्या संस्थेच्या सर्व सदस्यांना व कर्मचाऱ्यांना मनःपूर्वक सलाम..!*

*कोकणच्या प्रगतीसाठी हे कार्य प्रत्येकाला प्रेरणा देणारं आहे. या वेळी माझ्यासोबत श्री. प्रा. अमोल सुरवसे, तसेच रयत क्रांती संघटना प्रदेशाध्यक्ष श्री. सागर खोत, एस के इंटरनॅशनल स्कूलचे शिक्षक स्टाफ हे उपस्थित होते.''*

# अवकाश दिन विशेष : ‘सॅटेलाईट कम्युनिकेशन’ या विषयावर व्याख्यान






*Satellite Communication या विषयावर विद्यार्थ्यांना संबोधित करताना विज्ञानप्रेमी व उपग्रहतज्ज्ञ श्री. श्रीराम कोडुलकर, डेप्युटी जनरल मॅनेजर, टाटा कम्युनिकेशन्स*

अवकाश दिनाचे औचित्य साधून श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या इंग्रजी माध्यम शाळेत Satellite Communication या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख वक्ते म्हणून विज्ञान प्रेमी व उपग्रह तज्ज्ञ श्री. श्रीराम कोडुलकर, डेप्युटी जनरल मॅनेजर, टाटा कम्युनिकेशन्स हे उपस्थित होते.

श्री. कोडुलकर यांनी आपल्या प्रभावी व्याख्यानात उपग्रहांची रचना, कार्यपद्धती तसेच संप्रेषण क्षेत्रातील उपग्रहाचे महत्त्व याबद्दल दृकश्राव्य माध्यमातून माहिती दिली तसेच त्यांना आलेले अनुभव विद्यार्थ्यांसमोर मांडले. १९५७ साली रशियाने ‘स्पूटनिक’ हा पहिला उपग्रह अवकाशात प्रक्षेपित केला तो जवळजवळ २२ दिवस कार्यरत होता. त्यानंतर १९५८मध्ये अमेरिकेने ‘स्कोर’या पहिल्या संप्रेषण उपग्रहाचे (Communication Satellite) प्रक्षेपण केले ज्यामुळे आधुनिक संप्रेषण युगाची सुरुवात झाली. १९६९ मध्ये ISROची स्थापना होऊन १९७५मध्ये भारताने ‘आर्यभट्ट’ हा पहिला उपग्रह प्रक्षेपित केला, याबद्दल श्री. कोडुलकर यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.

श्री. कोडुलकर यांनी पुढे LEO (Low Earth Orbit), MEO (Medium Earth Orbit) आणि GEO (Geostationary Equatorial Orbit) या कक्षांनुसार उपग्रहांचे प्रकार, त्यांची वैशिष्ट्ये व उपायोजन याची सविस्तर माहिती सांगितली. LEO हे पृथ्वीपासून १६० ते २००० किलोमीटर उंचीवर फिरतात व त्यांचा कार्यकाल तीन ते आठ वर्षांचा असतो. MEO हे उपग्रह २००० ते ३५,७८० किलोमीटर उंचीवर फिरतात व त्यांचा कार्यकाल दहा ते पंधरा वर्षांचा असतो, तर GEO हे उपग्रह ३५,७८६ किलोमीटर उंचीवर फिरतात ते पंधरा वर्षांपर्यंत कार्यरत असतात.

एक GEO उपग्रह हा पृथ्वीचा एक तृतीयांश भाग व्यापतो. त्यामुळे संपूर्ण पृथ्वी व्यापण्यासाठी किमान तीन उपग्रह आवश्यक असतात मात्र प्रत्यक्षात चार GEO उपग्रह असतात व चौथा उपग्रह ओव्हरलॅपिंग झोनसाठी असतो, याचे महत्त्व ही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. हे अधिक स्पष्ट करण्यासाठी त्यांनी कॅप्टन दिलीप दोंदे, सेवानिवृत्त भारतीय नौदल अधिकारी यांच्या ‘सागर सफारी’ या अद्भुत प्रवासाचा दाखलाही विद्यार्थ्यांना दिला. जहाजातून पृथ्वीची एकल, विना साहाय्यक प्रदक्षिणा पूर्ण करणारे ते पहिले भारतीय आहेत. या प्रवासादरम्यान उपग्रह संप्रेषणाच्या मदतीने त्यांच्याशी संपर्क कसा साधला गेला हे श्री. कोडुलकर यांनी सॅटेलाईट फोनचे मॉडेल व जहाजावरील संपर्क यंत्रणा दाखवून सांगितले.

इरिडियम सॅटेलाईट फोन हे १९९९ च्या कारगिल युद्धात अतिशय महत्त्वाचे ठरले. इरिडियम फोन हे LEOमध्ये कार्यरत असलेल्या उपग्रहावर आधारित संप्रेषण प्रणाली आहे. कारगिल परिसर डोंगराळ व कठीण असल्यामुळे पारंपरिक दूरसंचार साधने नीट चालत नव्हती त्यामुळे या युद्धात सॅटेलाईट फोनचा वापर केला गेला. या युद्धातील काही घटनांमुळे सॅटेलाईट कम्युनिकेशनचे महत्त्व तसेच धोकेही लक्षात आले असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

या व्याख्यानातून विद्यार्थ्यांना उपग्रह संप्रेषणाचे तांत्रिक पैलू, त्याचा इतिहास, कार्यपद्धती तसेच युद्धातील आधुनिक उपग्रह फोनचे महत्त्व याबाबत सखोल माहिती मिळाली. उपग्रहांच्या मदतीने जग अधिक जवळ आले असून त्याचा उपयोग शिक्षण, उद्योग व संरक्षण तसेच दैनंदिन जीवन यामध्ये किती व्यापक आहे हे स्पष्ट झाले. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाबद्दलची जिज्ञासा व उत्सुकता अधिक वाढली. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत शंका समाधान केले.

## मंगळागौरीतून नव विवाहितांचे सशक्तीकरण ०५.०८.२०२५ , १९.०८.२०२५

नवविवाहित महिलांसाठी गर्भधारणेपूर्वीचे आरोग्य या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी मंगळागौरीचे आयोजन केले जाते आणि त्यामुळे नवविवाहितेचे आरोग्य सुधारण्यास मदत होते.








## सामुदायिक वाढदिवस आणि लसीकरण

दर महिन्याला बालकांचे साग्रसंगीत वाढदिवस साजरे करण्याची वालावलकर रुग्णालयाची प्रथा आहे. आणि त्या निमित्ताने मुलांची आरोग्य तपासणी करून त्यांना व त्यांच्या पालकांना सकस आहार आणि सुदृढ आरोग्य यावर मार्गदर्शन करण्यासाठी सत्र आणि मोफत लसीकरण आयोजित करण्यात येते.









## दहीहंडी कार्यक्रम–

पौष्टिक आहार, व्यायामाचे महत्त्व तसेच संस्कृती आणि परंपरा यांचे बीज लहानपणापासूनच मुलांच्या मनात रुजावे यासाठी हा उपक्रम राबविला जातो. या निमित्ताने आरोग्य तपासणीही केली जाते.












## रायगड आणि सिंधुदुर्ग पत्रकार सदिच्छा भेट

आरोग्य सुविधा आणि आरोग्याबाबतची जनजागृती, कोकणवासीयांसाठी उपलब्ध उत्तम शैक्षणिक संधी, क्रीडा कौशल्य जोपासण्यासाठी आणि प्रोत्साहित करण्यासाठी क्रीडासंकुल या विषयी माहिती घेण्याकरिता रायगड आणि सिंधुदुर्ग येथील पत्रकारांनी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संकुलाला भेट दिली.





# ऊर्जा संवर्धन व नूतनीकरणीय स्रोतांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




*श्री. हृषीकेश जोशी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना*



*श्री. हृषीकेश जोशी विद्यार्थ्यांचे शंकासमाधान करताना*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, सावर्डे येथे दि. १३ सप्टेंबर २०२५ रोजी ऊर्जा विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते होते श्री. हृषीकेश जोशी, Vice President- Centre of Excellence, Biofuel Circle. त्यांनी 'Energy - Past, Present and Future' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आपल्या प्रबोधनपर व्याख्यानामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना ऊर्जेचे विविध प्रकार, दैनंदिन जीवनात ऊर्जा कशी वापरली जाते, विश्वाच्या आणि मानवाच्या इतिहासातील ऊर्जेची वाटचाल, लोकसंख्या व ऊर्जा वापर यांचा परस्परसंबंध याविषयी सखोल माहिती दिली. कोळसा, जल, अणुऊर्जा प्रकल्पांची रचना व कार्यपद्धती समजावून सांगत त्यांनी भारत व जगातील प्रतिव्यक्ती ऊर्जा वापरातील फरक स्पष्ट केला.

याचबरोबर जागतिक तापमानवाढ, हरितगृह परिणाम, क्योटो प्रोटोकॉल या महत्त्वाच्या संकल्पना समजावून देत विद्यार्थ्यांना पर्यावरणाच्या दृष्टीने ऊर्जा बचतीची आवश्यकता पटवून दिली. नूतनीकरणीय ऊर्जेचे प्रकार, जसे की सौर ऊर्जा, वारा ऊर्जा, बायोमास ऊर्जा, कचऱ्यापासून ऊर्जानिर्मिती यावर भर देत ऊर्जा संवर्धनाच्या उपाययोजनांवर त्यांनी प्रकाश टाकला. फक्त सैद्धांतिक माहितीपुरतेच न थांबता त्यांनी विद्यार्थ्यांना ऊर्जा क्षेत्रातील विविध संधी व करिअरच्या दिशा याविषयी मार्गदर्शन केले. ऊर्जा उत्पादन, व्यवस्थापन, संशोधन आणि तंत्रज्ञान क्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या नोकरीच्या संधी त्यांनी अधोरेखित केल्या. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची सविस्तर उत्तरे देत त्यांनी व्याख्यान अधिक संवादात्मक केले. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडलीच, शिवाय ऊर्जा संवर्धनाबाबत जबाबदार नागरिक म्हणून जागृतीदेखील झाली.

# मा. श्री. प्रमोद पाटील यांची एसव्हीजेसीटी डेरवणला सहकुटुंब सदिच्छा भेट



*श्रीकाकामहाराज आणि श्री. प्रमोद पाटील आपल्या कुटुंबियांसमवेत*

***श्री. पाटील यांचा अभिप्राय*** *- ''आज आपण सर्वांनी वेळ दिला त्याचबरोबर आदरणीय गुरुवर्य श्री काकामहाराज यांनी भरपूर वेळ देऊन आपले सर्व संस्थेच्या अधिपत्याखाली चाललेले उपक्रम मग ते मेडिकल कॉलेज असो, हॉस्पिटल असो, शाळा असो, नर्सिंग कॉलेजेस असो, स्पोर्ट्स ॲक्टिव्हिटीसाठी घेतलेले निर्णय हे समाजातील, महाराष्ट्रातील सर्वसामान्य गरजू युवकांसाठी - युवतींसाठी एक चांगला उपक्रम राबवीत आहात याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, मनाला खूप प्रसन्न वाटले आणि आदरणीय गुरुवर्य श्री काकामहाराज यांच्याबद्दल मनामध्ये जास्तच प्रेम व आदर निर्माण झाला.*

**प्रमोद पाटील** (उपाध्यक्ष - मुंबई शहर आणि दक्षिण मुंबई जिल्हा निरीक्षक, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष)

# मुंबई विद्यापीठाच्या चौथ्या कार्यशाळेचे डेरवणमध्ये भव्य उद्घाटन




सभामंचावर डावीकडून – गणेश जगताप, गणेश जाधव, विश्वंभर रेड्डी आणि उद्घाटनाच्या वेळी प्रास्ताविक करताना क्रीडासंचालक श्रीकांत पराडकर,

एसव्हीजेसीटी क्रीडासंकुल येथे दि. ४ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत मुंबई विद्यापीठाचा क्रीडा विभाग आणि एसएसटी कला आणि वाणिज्य महाविद्यालय यांनी संयुक्तपणे आयोजित चौथ्या 'क्रीडाशिक्षक कार्यशाळा आणि चर्चासत्रा'चे भव्य उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. क्रीडा शिक्षकांना आधुनिक आणि तांत्रिक प्रशिक्षण आणि व्यावसायिक दृष्टिकोन प्रदान करण्याच्या उद्देशाने चार दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात मुंबई विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. अजय भामरे प्रमुख पाहुणे होते. तसेच मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी, शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे संचालक डॉ. मनोज रेड्डी, एसएसटी कॉलेजचे संस्थापक प्राचार्य डॉ. पुरस्वानी, एसव्हीजेसीटी इंग्लिश मिडियम स्कूलच्या शैक्षणिक संचालिका शरयू यशवंतराव, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर व मुंबई विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालयांमधील २००हून अधिक क्रीडा शिक्षक सहभागी झाले होते.

तीन दिवसांसाठी आयोजित केलेल्या या कार्यशाळेमध्ये विविध विषयांच्या तज्ज्ञांची, ज्ञानसमृद्ध सत्रे पार पडली. त्यामध्ये डॉक्टर विश्वंभर जाधव यांचे स्ट्रेस मॅनेजमेंटवरील, फिजिओथेरपिस्ट डॉक्टर प्रभू यांचे इंटरॅक्टिव्ह फिटनेस सेशन, मनोज वर्मा यांचे ॲथलेटिक्ससाठीचे सत्र, स्मिता मनोहर यांचे डिजिटल स्पोर्ट्स मॅनेजमेंट आणि डॉक्टर आदित्य कुलकर्णी यांचे एनईपी आणि एन.ए.ए.सी यासाठीच्या एसओपीसाठीची सत्रे प्रशिक्षणार्थींसाठी महत्त्वाची ठरली.

उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी क्रीडा शिक्षणाचे बदलते स्वरूप आणि विद्यार्थ्यांमधील स्पर्धेच्या भावनेबद्दल आपले मनोगत व्यक्त केले आणि प्रशिक्षणात तंत्रज्ञानाच्या भूमिकेवर भर दिला. या शिक्षकांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्रीडा क्षेत्रातील विविध तज्ज्ञांनी प्रशिक्षण दिले. अद्ययावत नियमांचे ज्ञान, खेळांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर, क्रीडा मानसशास्त्र, तंदुरुस्ती आणि पोषण आहार यांसारख्या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विशेष म्हणजे कार्यशाळेत NAAC मूल्यांकन प्रक्रियेत क्रीडा विभागाची भूमिका यावर चर्चा करण्यात आली.

या कार्यशाळेच्या समारोप प्रसंगात मुंबई विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. अजय भामरे हे ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते. मुंबई विद्यापीठ अंतर्गत सर्व क्रीडा संचालकांना डेरवण येथील क्रीडा सुविधांची माहिती होऊन त्यांनी आपल्या खेळाडूंना सरावासाठी येथे आणून मुंबई विभागाचा नावलौकिक वाढवावा त्याचप्रमाणे क्रीडा संस्कृती ही केवळ स्पर्धेपुरती मर्यादित न राहता जीवनशैलीचा एक भागच व्हावा यासाठी सर्वांनीच एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे असे मार्गदर्शन केले. तसेच या कार्यशाळेसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा, प्रशस्त मैदाने, आधुनिक उपकरणे इत्यादि सुविधा असलेले क्रीडासंकुल उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे आभार मानतो, असे मनोगत व्यक्त केले.

कार्यशाळेसाठी उपस्थित क्रीडाशिक्षक



# तालुकास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धा जल्लोषात संपन्न



उद्घाटनप्रसंगी सौ. शर्मिला कानविंदे, क्रीडासंचालक श्रीकांत पराडकर, पोषणआहारतज्ज्ञ श्री. हृषीकेश चुणेकर आणि अन्य



एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात दि. ०५ व ०६ ऑगस्ट २०२५ या कालावधीत तालुकास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये तालुक्यातील एकूण ४००हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन पोषण आहारतज्ज्ञ हृषीकेश चुणेकर व श्रीमती शर्मिला कानविंदे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा क्रीडा कार्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक सचिन मांडवकर, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, चिपळूण तालुका क्रीडा स्पर्धा समन्वयक समीर कालेकर, क्रीडा शिक्षक उल्हास मोहिते, रोहित गमरे, भरत कररा, हेरंब शिर्के, आशिष कानापडे, आकाश जाधव, आदि मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धा निकाल पुढीलप्रमाणे :-

१४ वर्षांखालील मुलांच्या वयोगटात चुरशीने खेळल्या गेलेल्या अनेक सामन्यांमध्ये एस. पी. एम. इंग्लिश मिडियम स्कूल संघाने मेरी माता स्कूल संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले. तर एसव्हीजेसीटी इंग्लिश मिडियम स्कूल, डेरवण संघाने तिसरे स्थान पटकाविले. १४ वर्षांखालील मुलींमध्ये एस. पी. एम. इंग्लिश मिडियम स्कूल संघाने मेरी माता स्कूल संघाविरुद्ध दमदार खेळ करून अंतिम सामना जिंकला.

१७ वर्षांखालील मुलांच्या वयोगटामध्ये एस. पी. एम. इंग्लिश मिडियम स्कूल व एसव्हीजेसीटी इंग्लिश मिडियम स्कूल, डेरवण यांच्यामधील झालेल्या अंतिम सामन्यात एस. पी. एम. इंग्लिश मिडियम स्कूल या संघाने चमकदार कामगिरी करीत अंतिम विजेते पदकावर नाव कोरले. तसेच यश इंग्लिश स्कूल संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

१९ वर्षांखालील झालेल्या मुलांच्या अंतिम सामन्यात डी.बी.जे. कॉलेज, चिपळूण आणि नॅशनल इंग्लिश मिडियम स्कूल यांमध्ये झालेल्या रोमहर्षक सामन्यामध्ये डी.बी.जे. कॉलेज, चिपळूण या संघाने १-०ची आघाडी घेऊन विजेतेपद पटकावले. १९ वर्षांखालील मुलींच्या गटात झालेल्या चुरशीच्या अंतिम सामन्यामध्ये गोविंदराव निकम माध्यमिक विद्यालय, सावर्डे संघ सुवर्ण कामगिरी करीत विजेतेपदाचा मानकरी संघ ठरला तर उपविजेतेपद मेरी माता स्कूल, चिपळूण संघाने मिळविले.

ग्रामीण भागात असलेल्या अशा प्रकारच्या कौतुकास्पद क्रीडा सुविधा फार अभावानेच पाहायला मिळतात. परंतु येथे खेळाडू, प्रशिक्षक या सर्वांनाच कोणतीही अडचण न येता सराव करता यावा अशी व्यवस्था असणारे हे एकमेव क्रीडासंकुल आहे, असे स्पर्धेसाठी संघ घेऊन आलेले डी.बी.जे. कॉलेजचे क्रीडा प्रशिक्षक उल्हास मोहिते यांनी मत व्यक्त केले.

# डेरवण क्रीडासंकुलात जिल्हास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धा





उद्घाटन समारंभ

एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात दि. १० ते १२ सप्टेंबर २०२५ या कालावधीत जिल्हास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये १४, १७ व १९ वर्ष वयोगटातील मुले आणि मुलींमध्ये एकूण २७ संघ असे एकूण ४८६ खेळाडू सहभागी झाले होते.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा क्रीडा कार्यालयाचे क्रीडा मार्गदर्शक सचिन मांडवकर, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, क्रीडा शिक्षक राकेश मालप, समिर यादव, कृष्णा गावडे, जीवनराज कांबळे, अमृत कडगावे, अजित दवडे, कुणाल चव्हाण, आशिष कानापडे, आदि मान्यवर उपस्थित होते. येथील क्रीडासंकुलात येऊन स्पर्धा खेळणे हा आमच्यासाठी नवी दिशा देणारा अनुभव आहे. ग्रामीण भागात असलेल्या अशा प्रकारच्या कौतुकास्पद क्रीडा सुविधा फार अभावानेच पाहायला मिळतात. परंतु येथे खेळाडू, प्रशिक्षक या सर्वांनाच कोणतीही अडचण न येता सराव करता यावा अशी व्यवस्था असणारे हे एकमेव संकुल आहे असे स्पर्धेसाठी संघ घेवून आलेले प्रशिक्षक कृष्णा गावडे यांनी मत व्यक्त केले.

स्पर्धा निकाल पुढीलप्रमाणे :-

१४ वर्षांखालील मुलांच्या वयोगटात चुरशीने खेळल्या गेलेल्या अनेक सामन्यांमध्ये एस.पी.एम. इंग्लिश मिडियम स्कूल, चिपळूण संघाने रोटरी इंग्लिश मिडीयम स्कूल, खेड संघाचा पराभव करून विजेतेपद पटकावले. तर सेंट थॉमस रत्नागिरी संघ तिसऱ्या स्थानावर राहिला. १४ वर्षांखालील मुलींमध्ये सेंट थॉमस रत्नागिरी संघाने कै. सौ. मीनाताई ठाकरे माध्यमिक विद्यालय, संगमेश्वर संघाविरुद्ध दमदार खेळ करून अंतिम सामना जिंकला. तसेच एस. पी. एम. इंग्लिश मिडियम स्कूल, चिपळूण संघाने तृतीय क्रमांक पटकाविला.

१७ वर्षांखालील मुलांच्या वयोगटामध्ये एस.पी.एम. इंग्लिश मिडियम स्कूल, चिपळूण या संघाने चमकदार कामगिरी करीत अंतिम विजेते पदकावर नाव कोरले. रोटरी इंग्लिश मिडीयम स्कूल, खेड उपविजेते, तसेच सेंट थॉमस रत्नागिरी संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. १७ वर्षांखालील मुलींच्या गटात एसव्हीजेसीटी इंग्लिश मिडियम स्कूल संघाने सेक्रेट हार्ट कॉन्व्हेंट रत्नागिरी संघाविरुद्ध रोमहर्षक खेळ करून विजेतेपद पटकाविले आणि पी. एस. बने इंटरनॅशनल, संगमेश्वर संघ तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला.

१९ वर्षांखालील झालेल्या मुलांच्या अंतिम सामन्यात अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी या संघाने डी.बी.जे. महाविद्यालय चिपळूणचा पराभव करून विजेतेपद पटकावले. तसेच कै. प्र. ग. कांबळे ज्ञानदीप विद्यामंदिर, खेड संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. १९ वर्षांखालील मुलींच्या गटात झालेल्या चुरशीच्या अंतिम सामन्यामध्ये अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय, रत्नागिरी संघ सुवर्ण कामगिरी करीत विजेतेपदाचा मानकरी संघ ठरला तर उपविजेतेपद ज्ञानदीप इंग्लिश मिडीयम स्कूल, खेड संघाने मिळवले. तसेच तृतीय स्थान गोविंदराव निकम माध्य. व उच्च माध्य. विद्यालय, सावर्डे संघाने पटकाविले.

# डेरवण क्रिडा संकुलात जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धांचा जल्लोष

एसव्हिजेसीटी क्रीडासंकुलात दि. २४ ऑगस्ट २०२५ रोजी रत्नागिरी जिल्हा ज्युनिअर ॲथलेटीक्स चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील सर्व ९ तालुक्यांमधून ४५०हुन अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. १४, १६ व १८ वर्षे वयोगटातील मुले व मुलींकरिता आयोजित या स्पर्धेमध्ये राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडूही सहभागी झाले होते.

स्पर्धेची सुरूवात मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस मानवंदना देऊन करण्यात आली. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी रत्नागिरी जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे संदीप तावडे, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, क्रीडासंकुलातील प्रशिक्षक विनायक पवार, प्रतीक्षा पेंढारी, सागर साळवी, अविनाश पवार, तसेच क्रीडा शिक्षक आदि मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेतील विजयी खेळाडूंना मेडल व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रथम दोन क्रमांकाच्या विजेत्या खेळाडूंची दि. २ ते ५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत बालेवाडी, पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

डेरवण येथील अत्याधुनिक सिंथेटिक ट्रॅकवर काटेकोरपणे पार पडलेल्या या स्पर्धेमध्ये धावण्याच्या विविध अंतराच्या स्पर्धा, लांबउडी, उंचउडी, थाळीफेक, गोळाफेक, हातोडाफेक, भालाफेक अशा विविध क्रीडास्पर्धा पार पडल्या. खेळाडूंसाठी नव्याने उपलब्ध करण्यात आलेले हाय जंप पीट तसेच हर्डल्स स्पर्धेत वापरले गेल्यामुळे स्पर्धेसाठी उपस्थित असलेले प्रशिक्षक तसेच पालक यांनी स्पर्धेची गुणवत्ता अजून वाढल्याचे आवर्जून सांगितले.



अडथळ्यांची शर्यत

# नवव्या ज्युनिअर राष्ट्रीय लगोरी स्पर्धेत महाराष्ट्र संघाला दुहेरी मुकुट




डेरवण येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलात दि. २२ ते २४ ऑगस्ट २०२५ या कालावधीत 'ॲम्यॅचुअर लगोरी फेडरेशन ऑफ इंडिया'च्या मान्यतेने व 'महाराष्ट्र लगोरी संघटने'च्या वतीने नवव्या ज्युनिअर राष्ट्रीय लगोरी अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत भारतातील बिहार, छत्तीसगड, झारखंड, दमण आणि दीव, दादरा व नगर हवेली, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, पुडूचेरी, राजस्थान, तामिळनाडू आणि तेलंगणा या राज्यातून एकूण ३५०हून अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाप्रसंगी लगोरी फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते संदीप गुरव, रत्नागिरी जिल्हा क्रीडा अधिकारी विजय शिंदे, एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलाचे क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर, लगोरी संघटनेच्या पदाधिकारी ॲड. प्रिया गुरव, यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. तसेच सहभागी राज्यातील संघांनी संचलन करून मान्यवरांना मानवंदना दिली व खेळाडूंनी शपथ घेऊन स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.

स्पर्धेत मुलांच्या गटात झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्र संघाने विजेतेपद पटकावले तर तेलंगणा संघ उपविजेते पदाचा मानकरी ठरला. तामिळनाडू व कर्नाटक संघाने तृतीय क्रमांक पटकावला. मुलींमध्ये झालेल्या चुरशीच्या अंतिम सामन्यामध्ये महाराष्ट्र संघ सुवर्ण कामगिरी करीत विजेतेपदाचा मानकरी संघ ठरला तर उपविजेतेपद तेलंगणा संघाने मिळविले. तसेच तृतीय स्थान कर्नाटक व झारखंड संघाने पटकावले.

याचबरोबर टार्गेट टीम लगोरी प्रकारात मुलांमध्ये झारखंड विरुद्ध मध्यप्रदेश यांच्यामध्ये झालेल्या अंतिम सामन्यात झारखंड संघाने चमकदार कामगिरी करत अंतिम चषकावर नाव कोरले. तर तृतीय स्थान दादरा व नगर हवेली व आंध्रप्रदेश संघाने पटकावले. मुलींमध्ये झालेल्या रोमहर्षक सामन्यात मध्यप्रदेश संघाने उत्कृष्ट



कामगिरी करत विजेतेपद तर तामिळनाडू संघाने उपविजेतेपद पटकावले. पुडूचेरी व मुंबई संघाला तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभाप्रसंगी भारतीय लगोरी संघटनेचे पदाधिकारी, बी.के.एल. वालावलकर फिजिओथेरपी कॉलेजचे प्राचार्य चंद्रशेखर एल., विनायक पवार, प्रतीक्षा पेंढारी व सहभागी सर्व राज्यांचे पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. विजयी संघाना मेडल व आकर्षक चषक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी एसव्हीजेसीटी क्रीडासंकुल हे खरोखरच आदर्श केंद्र आहे. येथे उपलब्ध असलेली आधुनिक सोई सुविधा, उत्कृष्ट दर्जाची मैदाने, स्वच्छ व सुरक्षित वसतिगृह व्यवस्था आणि काटेकोर नियोजन यामुळे स्पर्धक, प्रशिक्षक आदी सर्वांनी क्रीडासंकुलाचे कौतुक केले. ग्रामीण भागात असूनही मोठ्या प्रमाणावर क्रीडासुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल आयोजकांचे प्रयत्न कौतुकास्पद आहेत. डेरवण क्रीडासंकुल हे केवळ स्पर्धांचे ठिकाण नसून खेळाडूंच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे प्रेरणास्थान आहे, असे मत तामिळनाडू संघाच्या प्रशिक्षकांनी व्यक्त केले.




*पारितोषिक वितरण समारंभात विजेता महाराष्ट्र संघ*

# ११वी बी.के.एल. वालावलकर क्रॉस-कंट्री स्पर्धा जल्लोषात संपन्न




*अटीतटीची स्पर्धा - अंतिम क्षण*



*धावपटू शिवानी गायकवाड पारितोषिक वितरण करताना*

मुसळधार पावसात स्पर्धकांच्या उत्साहामुळे ११वी भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर क्रॉसकंट्री स्पर्धा जल्लोषात पार पडली. डेरवण येथील एसव्हीजेसीटी क्रीडासंकुलाने दि. २९/०८/२५ रोजी आयोजित केलेल्या या क्रॉसकंट्री स्पर्धेत ४००पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

४ दिवस सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे स्पर्धा आयोजनाबाबत साशंकता निर्माण झाली होती. मात्र धावपटूंच्या उत्साहामुळे ही स्पर्धा मोठ्या जल्लोषात संपन्न झाली. रत्नागिरी जिल्हा ॲथलेटीक्स असोसिएशनच्या मान्यतेने १२, १४, १६ व १८ वर्षांखालील मुले व मुली अशा ८ गटात स्पर्धा घेण्यात आली. प्रत्येक गटातील प्रथम ५ क्रमांकाच्या खेळाडूंना रोख रक्कम, पदक व प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. तसेच सहभागी सर्व खेळाडूंना टी-शर्ट व अल्पोपहार देण्यात आला.

११ व्या भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत वालावलकर क्रॉसकंट्री स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय धावपटू शिवानी गायकवाड हिच्या हस्ते करण्यात आले. या वेळी शरयू यशवंतराव, डॉ. नेताजी पाटील, डॉ. चंद्रशेखर एल., अजित गाळवणकर, संदीप तावडे, क्रीडा मार्गदर्शक सचिन मांडवकर, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त जगदीश नानजकर, क्रीडा संचालक श्रीकांत पराडकर आदि मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेचा निकाल (अनुक्रमे प्रथम पाच क्रमांक) - **१२ वर्षांखालील मुले** - समर्थ सुर्वे, वेदित मोरे, अद्वित निकम, प्रणम्य शेंबेकर, आर्य थोरात. **मुली -** ईश्वरी मुळे, ईश्वरी गरुड, सुभद्रा कांबळे, प्रांजल घुमे, रचना शेवडे.

**१४ वर्षांखालील मुले** - श्रवण साळुंखे, वीर मेटकर, राज यादव, पार्थ कदम, अथर्व दवंडे. **मुली** - अबोली वास्के, चक्षुका लाडे, समीक्षा गुजाळे, तनिष्का माने, सायली गोंडल.

**१६ वर्षांखालील मुले -** पृथ्वी राजभोर, सिद्धेश कुरणे, रुद्र बरजे, सुमित रेवाळे, विपुल साळवी. **मुली -** अंजली काळभोर, प्राप्ती तराळ, गौरी क्षितप, नियती बने, साजिरी पावस्कर.

**१८ वर्षांखालील मुले -** अथर्व तळे, सपोहम साळुंखे, आर्यन नारवेकर, युवराज गावडे, मयूर सोयने. **मुली -** रिया गोंडल, मेघा सातपुते, श्वेता नवले, आरोहि पालखडे, मंजिरी गावडे.




***भर पावसात स्पर्धेला उत्साहाने सुरुवात***

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

# भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त दि. ५ सप्टेंबर रोजी शिक्षकदिन साजरा केला जातो. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात दि. ४ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षकदिन साजरा करण्यात आला.

डॉ. शशिकांत धुमाळे (प्राध्यापक, त्वचारोग) यांनी शिक्षकदिनाच्या दिवशी, 'इंदुमती बहुउद्देशीय प्रतिष्ठान, कोल्हापूर' या संस्थेतर्फे गुणवंत शिक्षकांचा सत्कार आयोजित केला होता. त्या निमित्ताने बोलताना डॉक्टर धुमाळे यांनी श्रीविठ्ठलराव जोशी ट्रस्ट आणि वालावलकर वैद्यकीय महाविद्यालाबद्दल गौरवोद्गार काढले. ''ही संस्था सेवाभावी असून त्यांचे दातृत्व वाखाणण्याजोगे आहे. इतक्या चांगल्या संस्थाशी मला जुळवून घेता आले, हे मी माझे भाग्य समजतो. इतर संस्थांमध्ये साठीनंतर तुम्हाला सेवानिवृत्त केले जाते अथवा कमी पगारात नोकरी करावी लागते. पण इकडे असे न करता सगळ्या सोयी उपलब्ध केल्या आहेत. संस्था आपले सर्व उत्पन्न शिक्षकवर्ग, विद्यार्थी व सामाजिक काम यासाठी खर्च करते ही बाब अधोरेखित करण्यासारखी आहे. भ. क. ल. वालावलकर या संस्थात आहे मी गेली ८ वर्षे नोकरी करीत आहे, आणि आता ही संस्था खूप मोठे शिखर गाठणार आहे, कारण ह्या संस्थेमध्ये श्रीकाका महाराज, श्री विकास वालावलकर यांचे मोठे योगदान असून ही संस्था गोरगरिबांना मदत करत आहे, म्हणून मी इकडे समाधानी आणि आनंदी आहे.''

'इंदुमती बहुउद्देशीय प्रतिष्ठान, कोल्हापूर' या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शशिकांत धुमाळे शिक्षकदिनाच्या निमित्ताने शिक्षक व गुणवान विद्यार्थी यांचा सत्कार गेली ३ वर्षे सातत्याने करीत आहे आणि ''या पुढेही करीत राहीन'' असे उदगार त्यांनी काढले.

डॉ. अरविंद यादव, डॉ. अनघा मोडक, डॉ. चेतन जावसेन, डॉ. गजानन वेल्हाळ, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. आनंद गजकोष, डॉ. प्रतीक शहाणे, डॉ. राजीव केणी, डॉ. प्रशांत मूल्या हे सर्वोत्कृष्ट संशोधक पुरस्काराचे मानकरी ठरले.

सर्वोत्तम वाचक विद्यार्थी - समुद्रवड गणेश, कंठाळे कल्याणी, डॉ. प्रतिभा पाटील, सुमती हिरेमठ यांना वाचन संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे म्हणून पुरस्कृत करण्यात आले.

वैद्यकीय विद्यार्थी बळवंत मसुरकर आणि सुहासी चौहान यांना २०२४-२५ या वर्षासाठी 'आय.सी.एम.आर. एस.टी.एस.' शिष्यवृत्ती मिळाल्याबद्दल पुरस्कार देण्यात आला.

डॉ. जाधव यांनी इतिहासातील गुणवंत शिक्षकांचे स्मरण करण्यासाठी एक सादरीकरण करून त्यांच्या कर्तृत्वाला उजाळा दिला. अशाप्रकारे हा शिक्षकदिन उत्साहात साजरा करण्यात आला.



*डावीकडून डॉ. राजीव केणी, डॉ. प्रतीक शहाणे, डॉ. प्रशांत मूल्या, डॉ. पुष्पा भुरूटे, डॉ. अनघा मोडक, डॉ. गजानन वेल्हाळ, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. शशिकांत धुमाळे (प्राध्यापक, त्वचारोग आणि इंदुमती फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष), डॉ. अरविंद यादव, डॉ. मानसिंगराव घाटगे (डीन), डॉ. आनंद गजकोष, डॉ. चेतन जावसेन,*

**मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक** : श्री. विकास कमलाकर वालावलकर यांनी धनश्री ऑफसेट, ३/२०८, पत्रकार कॉलनी, कुवारबाव, रत्नागिरी येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, डेरवण, पो. सावर्डे, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६ येथून प्रकाशित केले.Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०
नोंदणी क्रमांक : MAHMAR/2022/86035